ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 11 | JULY - 2019

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# स्मृतीग्रंथांची 'दया'

प्रणव दर्शनानंद चौसाळकर
संशोधक विद्यार्थी , भाषा व वाङ्मय संकुल,
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड.

## प्रस्तावना –

स्मृतींनी त्या काळात लोकांनी कसे राहावे, कसे जगावे या विषयी अनेक नियम घालून दिले होते. अनेक कायदे केले होते. आजच्या भाषेत सांगायचे झाल्यास स्मृती या त्या त्या काळातील संविधान होत्या. त्यांनी दिलेल्या नियमानुसार समाजाची वाटचाल होत होती. समाजाच्या या वाटचालीत स्मृतींनी सांगितलेल्या कायद्याप्रमाणेच त्यांनी सांगितलेल्या मूल्यांचा महत्वाचा वाटा होता. आजही समाजाच्या वाटचालीत त्या मूल्यांचा वाटा मोठा आहे. परंतु अनेक वेळा असे दिसून येते की, त्या मूल्यांचा ऱ्हास व्हायला सुरुवात झाली आहे. समाजातील एक विशिष्ट मनोवृत्ती या सर्व मूल्यांना झिडकारत आहे. त्यामुळे आपण दूरदर्शन, वर्तमानपत्र, इंटरनेट सगळीकडे अशांतता पाहत आहोत. या सगळ्यांवर मात करण्यासाठी या सर्व मूल्यांचे योग्य ज्ञान समाजाला होणे गरजेचे आहे.

स्मृतीग्रंथांतील अश्याच मूल्यांपैकी एक असणारे 'दया' हे मूल्य. हे समजून घ्यायची, त्याचा स्वीकार करायची आज समाजाला अत्यंत आवश्यकता आहे.

## दयेचे लक्षण

"परस्मिन् बन्धुवर्गे वा मित्रे द्वेष्ये रिपौ तथा I
आत्मवद्वर्तितव्यं हि दयैषा परिकीर्तिता" II[i]

'आपल्या बन्धु-बांधवांसोबत, इतरांसोबत, मित्रांसोबत, द्वेष करणार्यासोबत तसेच शत्रुंसोबतही आपलेपणाने वागणे म्हणजे दया.'

या ठिकाणी ते सांगतात की, 'आत्मवद्वर्तितव्यं'. 'आत्मवद्' याचे अनेक अर्थ होताना दिसून येतात. गीर्वाणलघुकोशानुसार त्याचे 'जितेंद्रिय, शांत, ज्ञानी, दक्ष, सावध',[ii] असे अर्थ आढळून येतात तर इंग्रजीशब्दकोशात 'Self-Possessed, Possessed of self restraint, prudent, wise',[iii] असे अर्थ दिलेले आढळतात. त्याचा शब्दशः अर्थ बघितला तर, 'आत्म- स्वतः, वद्- प्रमाणे', म्हणजे 'स्वतःचे असल्याप्रमाणे' असा अर्थ होतो. दयेच्या संदर्भात जर पाहिलं तर, शब्दकोशांमध्ये आलेल्या वरील सर्व अर्थांपेक्षा त्याचा वर बघितलेला शब्दशः अर्थ योग्य आहे असे वाटते. वरील श्लोकाच्या अर्थाशी मिळतंजुळतं एक लक्षण वाचस्पत्यं या ग्रंथात सांगितलेलं आढळतं. ते सांगतात की,

"आत्मवद्सर्वभूतेषु यो हिताय शुभाय च I
वर्तते सततं हृष्टः क्रिया ह्येषा दया स्मृता" II[iv]

'सतत आनन्दित अन्तःकरणाने सर्व प्राणिमात्रांना आपलं समजून त्यांचं हित आणि कल्याण बघतो, त्या क्रियेला दया असे म्हणतात.'

वीरमित्रोदयपरिभाषाप्रकाशात दयेचं लक्षण सांगतात की,

"परे वा बन्धुवर्गे वा मित्रे द्वेष्टरि व सदा I
आपन्ने रक्षितव्यं तु दयैषा परिकीर्तिता" II[v]

'आपल्या लोकांना, दुसर्या लोकांना, मित्रांना व नेहमी आपला द्वेष करणार्यांना सुद्धा संकटांतून वाचवणे म्हणजे दया.'

यांचा सांगण्याचा अर्थ असा जाणवतो की, 'संकटांतून वाचवणे म्हणजे दया.' मग ते संकट आल्यावर वाचवताना ते कोणावर आले आहे हे पहायचे नाही. अश्याच प्रकारचा अर्थ असलेलं लक्षण, याज्ञवल्क्यस्मृतीच्या मिताक्षरी टीकेत आलेलं पाहायला मिळतं. ते सांगतात की,

"आपन्नरक्षणं दया"[vi]
'संकटांतून रक्षण करणे म्हणजे दया.'

शब्दकल्पद्रुमात वरील लक्षणांच्या पेक्षा वेगळा व व्यापक अर्थ असलेलं दयेचं लक्षण आलेलं आढळतं. ते सांगतात की,

"यत्नादपि परक्लेशं हर्तुं या हृदि जायते I
इच्छा भूमिसुरश्रेष्ठ सा दया परिकीर्तिता" II[vii]

'प्रयत्नपूर्वक दुसर्याचे दुःख नष्ट करण्याची मनात उत्पन्न झालेली जी इच्छा, तिला दया असे म्हणतात.'

या लक्षणात सांगितलेली 'दुसर्याचे दुःख दूर करण्याची जी इच्छा', त्या इच्छेला 'दया' असं नाव दिलेलं आढळून येतं. वरील बाकीच्या लक्षणांमध्ये 'आपले असल्यासारखे वागणे, त्याचं हित करणे आणि रक्षण करणे' अश्या कृतीरूप 'क्रियेला' 'दया' असं नाव दिलेलं आढळून येतं. परंतु शास्त्रीयदृष्ट्या जर पाहायला गेलं तर, सर्वलक्षणसंग्रहात असं सांगतात की, "दुःखिभूतेषु अनुकम्पा" तसेच "दुःखिनां प्रत्यनुजिघृक्षा"[viii] म्हणजे दया. दुःखिभूतेषु अनुकम्पा याचा अर्थ, दुःखिताला दुःख झालेलं पाहिल्यावर, त्याचं ते दुःख सहन न झाल्यामुळे आपल्या मनात 'अरेरे' अश्याप्रकारच्या शब्दांनी दुःख पाहून, त्यांच्याविषयी वाटणारी जी भावना ती म्हणजे दया' असा होतो तर दुःखिनां प्रत्यनुजिघृक्षा याचा अर्थ ' म्हणजे दया ही मनात उत्पन्न होणारी भावना आहे असे वरील लक्षणांचा अर्थ पहिला तर आपण म्हणू शकतो.

## दयेचे प्रकार

दयेच्या वरील विविध लक्षणांवरून आपण असे म्हणू शकतो की, दया हा शब्द एक जरी असला तरी, विविध घटना किंवा एकाच घटनेच्या विविध शब्दांतून ती दया व्यक्त होते. ती जी दया व्यक्त होते ती चार टप्प्यांनी व्यक्त होते. त्यातून दयेचे चार प्रकार उत्पन्न होतात असे सुद्धा मानता येईल.

१) पहिला टप्पा - अनुकंपा - दु:खी जीवाच्या ठिकाणी असणारी. दु:खिताच्या ठिकाणी, त्याला दु:ख झालेलं पाहिल्या पाहिल्या, माणुसकीच्या नात्याने सर्वप्रथम मनात येणारी जी भावना, ती म्हणजे अनुकंपा.
२) दुसरा टप्पा - करुणा - दुसर्याचं दु:ख सहन न झाल्यामुळे जी भावना निर्माण होते, ती भावना म्हणजे करुणा.
३) तिसरा टप्पा - दया - दुसर्याच्या दु:खाचं हरण करण्याची इच्छा.

दु:खिताला दु:ख झालेलं पाहून, त्याची मदत करण्याची, त्याचं दु:ख दूर करण्याची आपल्या मनात जी इच्छा उत्पन्न होते, ती म्हणजे दया.

हे तीनही टप्पे आणि हे तीनही प्रकार अतिशय महत्त्वपूर्ण आहेत, कारण अनुकम्पेशिवाय कारुण्य निर्माण होणार नाही आणि कारुण्य निर्माण झाल्याशिवाय दु:ख दूर करण्याची इच्छा म्हणजे दया निर्माण होणार नाही. याचा अर्थ असा होणार नाही की, अनुकंपा झाली म्हणजे कारुण्य निर्माण होईलंच आणि कारुण्य निर्माण झालं म्हणजे दया निर्माण होईलंच. कदाचित काही ठिकाणी अनुकंपा किंवा कारुण्य हा शेवटचा टप्पाही असू शकेल. हे सगळं प्रत्येकाच्या विचारसरणीवर अवलंबून आहे असे म्हणता येऊ शकते. परंतु तिसर्या टप्प्यातील दया जर निर्माण व्हायची असेल तर मात्र आधीचे दोन टप्पे आवश्यकंच आहेत.

४) चौथा टप्पा - घृणा - दुसर्याचं दु:ख पाहिल्यावर, दु:ख देणार्याविषयी जे वाटते. व्यावहारिकदृष्ट्या जर विचार केला तर घृणा हा दयेचा चौथा टप्पा मानता येऊ शकेल. कारण एखाद्याचं दु:ख दूर करण्याची इच्छा झाल्यानंतर, क्वचित प्रसंगी किंवा बहुतेक वेळेस आपल्याला समोरच्या व्यक्तीच्या दु:खाचं कारण असणार्या माणूस, परिस्थिती, काळ यांचा तिरस्कार वाटतो. वस्तुतः स्मृतीग्रंथांमध्ये तिरस्कार, घृणा यांचा त्याग करावा असे सांगितले असले, त्यांची निंदा जरी केलेली असली तरी या ठिकाणी मात्र ती घृणा, तो तिरस्कार योग्य आहे असे दिसून येते. तीसुद्धा एकप्रकारची दयाच आहे. अमरकोशकार घृणा हे दयेचंच रूप मानतात.[ix]

## दयेचा उपदेश

दयेबद्दल उपदेश करताना सर्व जण एकंच उपदेश करताना दिसून येतात की, सर्व प्राणीमात्रांवर दया करा. हे सांगताना काही स्मृती दया करणार्याची स्तुती करतात, उदा. दक्षस्मृतीत असं सांगतात की, 'जो दयाळू आहे तोच गृहस्थ खरा धार्मिक आहे व पुढे लगेच सांगतात की, ज्याच्यात दया हा गुण आहे तोच गृहस्थ हा मुख्य गृहस्थ आहे.'[x]

काही स्मृती पुण्यसाधन म्हणून त्याकडे बघतात. प्रजापतीस्मृतीत सांगतात की, 'पुण्य कमवायचे असेल तर सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी दया दाखवावी.'[xi]

काही स्मृती कर्तव्य समजून सुद्धा दया करावी असे सांगताना दिसून येतात. बुधस्मृतीत सांगतात की, 'सर्वप्राणिमात्रांच्या ठिकाणी दया करावी.'[xii] लघुविष्णुस्मृतीतही सांगतात की, 'सर्व प्राणिमात्रांवर नेहमी दया करावी.'[xiii] या स्मृतींनी काहीही आशा न दाखवता किंवा स्तुती न करता सरळ सरळ दया करण्याचा उपदेश दिलेला आढळतो.

## उपसंहार –

'सर्वेषां अनुकूलवेदनीयं सुखं' I सर्वांना जे हवंहवंसं वाटतं ते म्हणजे सुख. मनुष्य सुखासाठीच जगात असतो. क्षणिक सुखापेक्षा माणसाची प्रवृत्ती शाश्वत किंवा टिकणार्या सुखाकडे अधिक असते. परंतु ते सुख मिळवण्यासाठी देण्यात येणारा मोबदला माणसाला नको असतो. तो मोबदला म्हणजेच मूल्य. वस्तुतः स्मृतीग्रंथांमध्ये अनेक मार्गदर्शक गोष्टी

आहेत. आजच्या काळात त्यांना संविधानाचा दर्जा जरी नसला तरी त्यात मनुष्यजीवनासाठी अनेक उपयुक्त गोष्टी सापडतील. त्यात अनेक गोष्टी आज कालबाह्य झालेल्या देखील आहेत. परंतु आपली संस्कृती आपल्याला प्रत्येकाकडे जे चांगले आहे ते ग्रहण करायला शिकवते. त्यामुळे स्मृतीग्रंथांकडे ज्या काही चांगल्या गोष्टी असतील त्या ग्रहण केल्याच पाहिजेत. त्यांच्यापैकीच एक म्हणजे मूल्य. त्यांच्या योग्यदृष्टीने झालेला अभ्यास हा समाजाला व पर्यायाने देशाला अत्यंत उपकारक ठरू शकतो.

---

[i] श्लो.४१, अत्रि.

[ii] आत्मवद्, गीर्वाणलघुकोश

[iii] आत्मवद्, आपटे.

[iv] दया, वाचस्पत्य. पाचवा भाग.

[v] पान.३३, वीरमित्रोदयपरि.प्रकाश

[vi] मिताक्षरी, श्लो.१२२, अ.१, याज्ञ.

[vii] दया, शब्दकल्पद्रुम

[viii] दया, सर्वलक्षणसंग्रह

[ix] १/७/१८, अमरकोश

[x] श्लो.४८/४९, दक्ष. स्मृ.

[xi] श्लो.१४८, प्रजापति.

[xii] अ.१, बुधस्मृती

[xiii] श्लो.४, अ.४, लघु.विष्णु. स्मृ.

## संदर्भग्रंथ


१) वाचस्पत्य – बृहत् संस्कृताभिधानम्, पञ्चमो भागः, श्रीतारानाथ तर्कवाचस्पति भट्टाचार्येण सङ्कलितं, चौखम्भा संस्कृत ग्रन्थमाला – ९४, चौखम्भा संस्कृत सीरिज आफ़िस, वाराणसी -१, १९६२.

२) सर्वलक्षणसंग्रह – रचयिता – स्वामी गौरीशंकर भिक्षु, हरिदास संस्कृत ग्रंथमाला – ३४१, प्रका. - चौखम्भा संस्कृत सीरीज आफिस, वाराणसी. पुनर्मुद्रित २०१०

३) गीर्वाणलघुकोश – संस्कृत-मराठी शब्दकोश, संपादक – कै.ज.वि. ओक, चवथी आवृत्ती, २००२, प्रका. – आनंद लाटकर, कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., पुणे ३०

४) वीरमित्रोदयः – महामहोपाध्यायपण्डितमित्रमिश्रप्रणीतः, परिभाषाप्रकाशः संस्कारप्रकाशश्च, भागद्वयात्मकः, संपादकः – म.म.श्री नित्यानंदपंतपर्वतीयः, चौखम्बा संस्कृत सीरीज ३०, चौखंबा संस्कृत सीरीज ऑफिस, वाराणसी. ISBN – ९७८-८१-७०८०-३७०-६ (१-२ भाग), ७९८-८१-७०८०-३८१-२ (सेट).

५) अष्टादश स्मृति – भाषा टीका सहित, मूल लेखक – पं.मिहिर चन्द्र, नाग पब्लिशर्स, दिल्ली, तृतीय संस्करण – २००६, ISBN – ८१-७०८१-२००-३.

६) याज्ञवल्क्यस्मृति – विज्ञानेश्वर प्रणीत 'मिताक्षरा' व्याख्यया, 'प्रकाश' हिंदी व्याख्यया च विभूषिता, हिंदी व्याख्याकार – उमेशचंद्र पाण्डेय, काशी संस्कृत ग्रंथमाला – १७८, प्रका. चौखम्भा संस्कृत संस्थान, वाराणसी २२१००१, सातवी आवृत्ती, २००३, ISBN – ८१-८६९३७-५०-१

७) अमरकोश

८) The Practical Sanskrit English dictionary, fourth revised and enlarged edition - 1965, vaman shivram apte, motilal banarasi das, ISBN – 0-89581-171-5,